सन २००६-२००७ या वर्षापासून राज्यातील मान्यताप्राप्त विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना अनुदान मंजूर करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग**
**शासन निर्णय क्र. प्राशाअ-१२०६/(३४३/०६)/प्राशि-३,**
**मंत्रालय विस्तार भवन,मुंबई - ४०० ०३२,**
**दिनांक : १६ सप्टेंबर, २००६**

संदर्भ :- १) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.व्हिएलएस-२०००/(२४५५)/प्राशि-१, दिनांक ०८.११.२०००

२) प्राथमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची खाप्राशा/२००३-२००४/ पुरवणी मागणी /५११ ड, दिनांक ६.१.२००६, दिनांक १०.१.२००६,दिनांक १८.१.२००६, दिनांक ३.२.२००६, दिनांक ४.२.२००६, दिनांक ८.२.२००६ दिनांक १०.२.२००६ ची पत्रे व सहपत्रे.

३) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक - पूरक-२९०६/(५६/२००६)/ अर्थसंकल्प, दि. १३ सप्टेंबर, २००६

**शासन निर्णय :-** शासनाने परवानगी दिलेल्या मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित प्राथमिक शाळांची तपासणी करुन संदर्भाधीन क्रमांक १ मधील शासन निर्णयानुसार विहित केलेल्या अटी / निकषांची पूर्तता करणा-या व सन २००५-२००६ या वर्षामध्ये २० टक्के अनुदानास पात्र ठरणा-या १३० प्राथमिक शाळांची यादी प्राथमिक शिक्षण संचालकांनी शासनांस सादर केली आहे. सदर १३० मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना (या शाळांतील एकूण ५२० शिक्षकांच्या पदांना ) सन २००६-२००७ या वर्षी माहे "सप्टेंबर,२००६" पासून विहित अनुदानसूत्रानुसार ४० टक्केप्रमाणे अनुदान मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच या प्रयोजनार्थ रु. १,०७,००,०००/- (रुपये एक कोटी सात लक्ष फक्त ) खर्च करण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. अनुदान द्यावयाच्या जिल्हानिहाय पात्र शाळांची यादी सोबत जोडण्यात आली आहे.

सदर यादीतील शाळां सन २००५-२००६ या वर्षी अनुदानास पात्र ठरलेल्या असल्या तरी त्या शाळांना यापूर्वीचे कोणतेही थकीत अनुदान देय नाही, या अटीवरच हे अनुदान मंजूर करण्यात येत आहे. अनुदान अदा करण्यापूर्वी यादीतील शाळांपैकी कोणत्याही शाळेस यापूर्वी अनुदान दिलेले नाही, तसेच कोणत्याही शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेली नाही, याची प्रथम खात्री करावी.

यादीतील सदर १३० विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना अनुदान देण्यासाठी शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी उपरोक्त तरतुदीचे जिल्हावार वाटप करावे. तसेच शिक्षणाधिका-यांनी नियमानुसार आवश्यक बाबी तपासून सदर १३० विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना अनुदान अदा



Scanned with CamScanner

करावे व शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर शाळांना अनुदानाचे वितरण केल्याबाबतचा आपला कार्यपूर्तीचा अहवाल शासनांस दोन महिन्याच्या आंत सादर करावा. या योजनेसाठी होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्याखाली पूरक मागणीद्वारे मंजूर झालेल्या सन २००६-२००७ या वर्षीच्या उपलब्ध मंजूर तरतुदीतून भागविण्यांत यावा व तो मासिक निधी विवरणपत्रानुसार खर्च करण्यांत यावा.

"२२०२-सर्वसाधारण शिक्षण - ०१ - प्राथमिक शिक्षण - १०३, प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थाना सहाय्य (०४ )(००) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- (०५)(०४) खाजगी प्राथमिक शाळांना सहाय्य- (२२०२ ३२६१), मागणी क्र. ई-२."

हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५९०/२००६/व्यय-५, दिनांक ०८ सप्टेंबर,२००६ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

प्र कृ सगदेव

(प्र.कृ.सगदेव)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
।शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
प्रत,
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व जिल्हयांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
महालेखापाल (लेखा परीक्षा ), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
सर्व जिल्हयांचे कोषागार अधिकारी.
नियोजन विभाग (१४७१)/ वित्त विभाग (व्यय-६)
अर्थसंकल्प कार्यासन, शालेय शिक्षण विभाग.
निवड नस्ती, प्राशि-३.

सदर शासन निर्णय सांकेतांक क्र. 200609201224 36001 हा आहे

Scanned with CamScanner

(शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. प्राशाअ-१२०६/(३४३/०६)/प्राशि-३,
दिनांक - १६ सप्टेंबर, २००६ चे सहपत्र)

## सन २००६-२००७ या वर्षांत अनुदानास पात्र ठरलेल्या विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांची यादी.

| अ. क्र. | संस्थेचे नांव/शाळेचे नांव | शासन परवानगी आदेश क्र.व दि. | शाळा परवानगी वर्ष | माध्यम व मान्य वर्ग |
|---|---|---|---|---|
| | जिल्हा - रायगड | | | |
| १ | कर्जत महिला मंडळाचे विद्याविकास मंदीर, कर्जत | व्हीएलएस-१०९४/ ८०६२/ प्राशि-३, दि.२२.११.१९९५ | १९९४-९५ | मराठी १ ते ४ |
| २ | न्यू. कळंबोली एज्युकेशन सोसायटी संचलित न्यू इंग्लिश स्कूल,कळंबोली, पनवेल | व्हीएलएस-२०००/५५७(३)/प्राशि -३, दि.१८.१०.२००० | २०००-०१ | मराठी १ ते ४ |
| | **जिल्हा - ठाणे** | | | |
| ३ | भास्कर शिक्षण मंडळ, कल्याण संचलित भास्कर हिंदी विद्यालय, शहापूर | व्हीएलएस-१०००/५५७(१)/प्राशि -३, दि.०८.०८.२००१ | २०००-०१ | हिंदी १ ते ४ |
| ४ | पुणे विद्यार्थीगृह संचलित विद्याभवन प्राथमिक शाळा, नेरुळ | व्हीएलएस-१०००/५५७(१)/प्राशि -३, दि.१६.०६.२००१ | २०००-०१ | मराठी १ ते ४ |
| ५ | ज्ञानदीप सेवा मंडळाची प्राथमिक शाळा, करावे, नवी मुंबई | व्हीएलएस-१०००/५५७(१)/प्राशि -३, दि.१६.०६.२००१ | २००१-०२ | मराठी १ ते ४ |
| ६ | जीवन ज्योती एज्युकेशन ट्रस्ट, ऐरोली, जयहिंद विद्यालय, ऐरोली, नवी मुंबई | व्हीएलएस-१०००/५५७(१)/प्राशि -३, दि.०८.०८.२००१ | २०००-०१ | हिंदी १ ते ४ |
| ७ | तेरणा पब्लीक चॅरीटेबल ट्रस्ट, उस्मानाबाद संचलित तेरणा विद्यालय,कोपरखैरणे, नवी मुंबई | व्हीएलएस-१०००/५५७(१)/प्राशि -३, दि.३१.०८.२००१ | २०००-०१ | मराठी १ ते ४ |
| ८ | श्री.साईराम एज्युकेशन सोसायटी, भांडुप (प.), मुंबई संचलित कैवल्य विद्यालय, रेतीबंदर, मुंबई पुना रोड,मुंब्रा | व्हीएलएस-१०९९/ २६०/प्राशि-३, दि.१८.०६.१९९९ | १९९९-०० | मराठी १ ते ४ |
| ९ | माताबक्ष तिवारी मेमोरियल सोसायटीचे अंकित प्राथमिक विद्यालय, वासुंद्री रोड, मांडा-टिटवाळा | व्हीएलएस-१०००/५५७(१)/प्राशि -३, दि.२८.०५.२००२ | २०००-०१ | हिंदी १ ते ४ |
| १० | दुर्गेश शिक्षण संस्था संचलित शारदा हिंदी विद्यालय, बुवापाडा, अंबरनाथ, | व्हीएलएस-१०००/ ५५७/प्राशि-३, दि.०८.०८.२००१ | २०००-०१ | हिंदी १ ते ४ |
| ११ | अक्सा एज्युकेशन सोसायटी, भिवंडी संचलित अलनूर गर्ल्स उर्दू प्राथमिक शाळा, पोविंद्रा, भिवंडी | व्हीएलएस-१०००/५५७(१)/प्राशि -३, दि.०४.०४.२००१ | २०००-०१ | उर्दू १ ते ४ |
| १२ | सुबोध लोकहितवादी बहु. विचारमंच अडावत चोपडा, जळगांव संचलित सी.एम.उर्दू खाजगी प्राथमिक शाळा म्हाडा कॉलनी, नदीनाका,भिवंडी | व्हीएलएस-१०९९/ २६०/प्राशि-३, दि.०६.०७.१९९९ | १९९९-०० | उर्दू १ ते ४ |
| | **जिल्हा - पुणे** | | | |
| १३ | रास्तापेठ एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक शाळा, सोमवार पेठ, पुणे ११ | व्हीएलएस-१०९९/ २६०/प्राशि-३, दि. ६.०७.१९९९ | २०००-०१ | मराठी १ ते ४ |

Scanned with CamScanner